
स्वातंत्र्यमहोत्सव विशेषांक

ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO P' ST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 173

वर्ष १८ | पुणे, बुधवार, १६ ऑगस्ट. १९७२ | अंक १६



स्वातंत्र्यातुन
साध्य होउ दे...

स्वावलंबन
समता
सामाजिक न्याय

देश संपन्न व बलशाली करु या

संचालक, प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई.

**इंपाला ऐवजी अॅम्बॅसेडर**—केंद्रीय मंत्री श्री. सी. सुब्रमणियम आणि श्री. टी. ए. पै ह्यांनी त्यांच्यासाठी ठेवलेल्या आरामशीर इंपाला मोटारी न वापरता अॅम्बॅसेडर मोटारी वापरण्याचे ठरविले आहे.

**मुकंद आयर्नचे सुयश**— मुकंद आयर्न अँड स्टील वर्क्सने ३१ मार्च, १९७२ अखेर संपलेल्या वर्षी २३·५६ कोटी रु. ची विक्री करून ठोक नफा ३·८८ कोटी रु. मिळविला. म्हणजे विक्री ६·२२ कोटी रु. नी वाढली आणि ठोक नफा १·०४ कोटी रु. नी (३६%) ने वाढला. कंपनीने प्रत्येक भागास १·५० रु. डिव्हिडंड कायम ठेवून पुन: एका भागास एक भाग बोनस शेअर जाहीर केला आहे.

**जपानचा अमेरिकेवर उपकार**— जपान आणि अमेरिका ह्यांच्या व्यापारात अमेरिकेला प्रतिकूल तफावत आहे, ती कृत्रिम रीतीने भरून काढण्यासाठी जपान ५५ कोटी डॉलर्स किंमतीचा अमेरिकन माल आयात करणार आहे. ह्या आयातीत चार जेट वाहतूक विमाने आणि सहा एअर बसेसचा समावेश आहे.

**चोरांना दाद न देणारी मोटारींची कुलपे**—गुजरातमधील दोघा एंजिनिअर्सनी चोरांना दाद न देणारी विजेवर चालणारी कुलपे शोधून काढली आहेत. त्यांपैकी एक कुलूप गाडीच्या वीज-प्रवाहाशी जोडलेले असते. त्याची किंमत २५० रुपये आहे. दुसरे कुलूप रेडिओ व्हॉल्व्हच्या पद्धतीचे आहे. जरूर पडल्यास ते स्कूटरलाही लावता येते.

**बहुतेक रशियनांना दोनपेक्षा अधिक अपत्ये नकोत**— कीव्ह (रशिया) येथे १०,००० तरुण जोडप्यांना विचारणा करता, बहुसंख्य दांपत्यांना दोनपेक्षा अधिक अपत्ये नको आहेत. १३% दांपत्यांना एकच अपत्य पुरे आहे.

**चित्रपटांसाठी परदेशी चलन**— हिंदमधील चित्रपट निर्मितीच्या व्यवसायासाठी देण्यात येणाऱ्या परदेशीय चलनातील रकमेत वाढ करण्यात आली आहे. ही रक्कम २५ लाख रुपयांवरून ५० लाख रु. करण्यात आली आहे. मिळणाऱ्या परदेशीय चलनापैकी प्रत्येकी २२ लाख रुपयांचे चलन मुंबई व दक्षिण भारत विभागाला देण्यात आले असून ६ लाख रुपयांचे पश्चिम बंगालला देण्यात आले आहे.

**आधुनिक विमाने परत घेणार**—इजिप्तमधून रशिअन सल्लागार काढून टाकण्याचा निर्णय अध्यक्ष सादत ह्यांनी घेतल्यावर रशिआ त्या देशातील आपली अत्याधुनिक बनावटीची विमाने परत नेत आहे. त्यात मिग लढाऊ विमाने आणि बाँबफेकी विमाने आहेत. त्यांची संख्या ७५ च्या आत बाहेर आहे.

**शरणागत डाकूंसाठी गीतरामायण**— चंबळ खोऱ्यातील जे डाकू शरण आले, त्यांच्यावर सुसंस्कार घडविण्यासाठी ग्वाल्हेरच्या केंद्रीय कारागृहात १५ ऑगस्ट रोजी गीतरामायणाच्या गायनाचा कार्यक्रम झाला. हे गीतरामायण श्री. ग. दि. माडगूळकरांच्या गीतरामायणाचे हिंदी रूपांतर आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणे ३०

**जे आंगी निष्काम आचारु । जीवीं विवेकु साचारु ।**
**तो सबाह्य धवला आकारु । शुचित्वाचा श्री ज्ञानेश्वरी**

यंदा भारतीय स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव आहे. या अभिमानास्पद रौप्यमहोत्सवी स्वातंत्र्य-दिनाच्या मंगलप्रसंगी भारताला स्वातंत्र्य मिळण्यासाठी, ज्या शूरवीरांनी व देशभक्तांनी आपले आयुष्य अर्पण केले, नाना हालअपेष्टा भोगून स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवली, त्या सर्वांना विनम्र अभिवादन!

या पंचवीस वर्षांच्या कालखंडात भारताने लोकशाही व समाजवादाच्या दिशेने स्पृहणीय प्रगती केली आहे. देशाची उत्तरोत्तर अशीच प्रगती होवो ही शुभेच्छा!

या रौप्यमहोत्सवी वर्धापन-दिनानिमित्त, आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा!

भारतीय स्वातंत्र्याचा जयजयकार असो!

ज. चं. आगाशे
ज्ञा. चं. आगाशे
जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर

# ☆ अर्थ ☆

बुधवार, १६ ऑगस्ट, १९७२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## नर्मदेच्या पाणीवाटपातील अडचणी

नर्मदा नदीपासून उपलब्ध होऊ शकणारे पाणी पंजाबमधील रावी, बिआस आणि सतलज ह्या नद्यांइतके विपुल आहे. पण ह्या नदीच्या खोऱ्याची विकासयोजना राज्यातील अंतर्गत वादाने धूळ खात पडली होती. आता मध्यप्रदेश, गुजरात, राजस्तान व महाराष्ट्र ह्या चारही राज्यांच्या मुख्य मंत्र्यांनी आपसात करार केला आहे. नर्मदा नदीच्या खोऱ्याचा विकास करण्याची योजना गुजरातमधील नवगाव येथे बांधावयाच्या उंचीवर अवलंबून आहे. ह्या धरणाची उंची ५३० फूट ठेवावी असे गुजरात राज्याचे म्हणणे आहे. ती तशी ठेवली तर महाराष्ट्राला व मध्यप्रदेशाला लाभकारक ठरवणारी जलसिंधी धरण योजना पार पाडणे शक्य होणार नाही. कारण जलसिंधी धरणाची जागा नवगाव धरणाच्या वर ३४ मैल असल्याने ती बुडूनच जाणार आहे. ही योजना मध्यप्रदेश सरकारशी सहकार्य करून पुरी करण्याचा महाराष्ट्राचा इरादा आहे. मध्यप्रदेशात महेश्वर आणि हरणफाळ ह्या ठिकाणी बांधण्यात यावयाची दोन्ही धरणेही ह्याच कारणासाठी रद्द करावी लागतील. ह्या तिन्ही धरणांच्या कामाला मंजुरी देण्यात आली तर गुजरात राज्यातील नवगाव धरणासाठी फारसे पाणीच शिल्लक राहणार नाही. म्हणून मग त्याची उंची २१० फुटाची ठेवावी लागेल. पण, मध्यप्रदेश व महाराष्ट्र राज्यांची खरी चिंता वेगळीच आहे. गुजरातमधील नवगाव धरणाची उंची ५३० फूट ठेवण्यात आली तर मध्य प्रदेशातील १ लाख, १५ हजार हेक्टर्स सुपीक जमीन आणि महाराष्ट्रातील ९,५०० हेक्टर्स चांगली जमीन पाण्याखाली जाणार आहे.

---

## मुलांच्या आरोग्यासाठी श्रीमंतावर कर

पंजाबचे मुख्य मंत्री श्री. झेल सिंग ह्यांनी एका मुलाखतीत मुलांच्या आरोग्यासाठी श्रीमंत लोकांवर कर बसविण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे असे सांगितले. ते म्हणाले की ह्या प्रश्नाचा विचार गेले काही दिवस चालू आहे. परंतु असा कर बसविण्यापूर्वी लोकमत अजमावण्यात येईल. बालकांच्या आरोग्याला अग्रहक्क देण्यात आला पाहिजे. मुले निरोगी आणि बलवान व्हावी म्हणून ज्यांच्याजवळ पैसा देण्याची ताकद आहे त्यांनी काहीना काहीतरी द्रव्य साहाय्य दिले पाहिजे. देवालय, गुरुद्वारे, मशिदी अगर चर्च ह्यांसारख्या इमारती बांधण्यापेक्षा मुलांच्या आरोग्याचा बळकट पाया घालणे अधिक महत्त्वाचे आहे. गुरू, संत, फकीर, अगर साधू मुलांच्यापेक्षा अधिक महत्वाचे असू शकत नाहीत. तथापि हे काम करण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न व्हावयास हवेत. धार्मिक संस्थांनी आपल्या पैशाचा उपयोग ह्या कामासाठी करावा. त्याचप्रमाणे नगरपालिका, बाजारसमित्या, जिल्हा परिषदा आणि सहकारी संघटना ह्यांनीही मुलांच्या आरोग्यसाधनेसाठी थोडाबहुत पैसा उपलब्ध करून दिला पाहिजे. डॉक्टर्स, हकीम आणि वैद्य ह्यांनीही ह्या बाबतीत आपला वाटा उचलण्यास पुढे आले पाहिजे. समाजहिताची काळजी घेण्याचे काम सरकारचे आहे, ही कल्पना आता स्वीकारण्यात आली आहे. तेव्हा निराधार मुलांची व्यवस्थाही लावण्यात आली पाहिजे. समाजहितदक्ष शासनाची कल्पना स्वीकारल्यावर गोरगरीब मुलांच्या संगोपनासाठी श्रीमंतांनी थोडासा करभार सोसण्यास तयार झाले पाहिजे. नाहीतर ही कल्पना वांझोटी ठरेल.

---

## एंजिनिअर्स व तंत्रज्ञ ह्यांना नोकऱ्या देण्याची योजना

एंजिनिअर्स आणि तंत्रज्ञ बेकार राहिल्यास उत्पादनाच्या हेतूने देण्यात आलेले शिक्षणसुद्धा कुचकामी ठरू लागते. इतर ज्ञानशास्त्रांच्या पदवीधरांची बेकारी कमी महत्त्वाची आहे असा मात्र अर्थ नाही. उत्पादनाच्या कामात मूलभूत असणाऱ्या यंत्रज्ञांना व तंत्रज्ञांना सवेतन उमेदवारी देण्याची योजना भारत सरकारने तयार केली आहे. नव्याने शिक्षित होणाऱ्या एंजिनिअर्सना आणि तंत्रज्ञांना ह्या योजनेचा फायदा मिळणार आहे. योजनेच्या आराखड्याप्रमाणे अशा तरुणांना मध्यम प्रतीच्या व छोट्या उद्योगधंद्यातून एक वर्षभर उमेदवारीची जागा देण्यात येईल. पुढे ह्याच उद्योगधंद्यातून कायम स्वरूपाची नोकरीही मिळण्याची त्यांना हमी देण्यात येईल. उमेदवारीच्या काळात पदवीधरांना दरमहा ४०० रुपये भत्ता देण्यात येईल. आणि पदविका-धारकांना २५० रुपये भत्ता देण्यात येईल. त्यांना देण्यात येणाऱ्या मेहनतान्यापैकी ५० टक्के रक्कम मध्यवर्ती सरकारकडून मिळणार आहे. ह्या योजनेमुळे रोजगाराच्या अधिक संधी तर उपलब्ध होतीलच; पण प्रशिक्षित तंत्रज्ञांना सामावून घेतल्यामुळे मध्यम प्रतीच्या व छोट्या उद्योगधंद्यातील कामाचा दर्जाही सुधारू शकेल. भारत सरकारने ही योजना अमलात आणण्यासाठी ५० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. ह्या रकमेची वाटणी चार विभागात सारखी करण्यात येणार आहे. पश्चिम भागासाठी १२.५ लाख रुपये उपलब्ध होतील. ह्या भागात महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश आणि गोआ-दमण दीव हा केंद्रशासित प्रदेश आहे.

## पगार गोठविण्याच्या शिफारसीचा राग

सामान्य माणसाच्या जीवनात पैशाचा दुष्काळ आणि वस्तूंचाही दुष्काळ दिसून येतो. अर्थशास्त्रज्ञ मात्र वस्तूंच्या दुष्काळाचा संबंध वाढत्या किमती व चढते पगार ह्यांच्याशी जोडून चलनवृद्धी ह्या एका शब्दात सगळे सार सांगण्याचा प्रयत्न करतो. आता चलनवृद्धी म्हटले की मोठाले पगार ओघानेच आले. ह्या वस्तुस्थितीतून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कचेरीचीही सुटका नाही. ह्या कचेरीत काम करणाऱ्यांना मिळणारे पगार व इतर सोयीसवलती ह्यांची तपासणी करण्यासाठी संघटनेच्या आमसभेने एका खास कमिटीची नेमणूक केली होती. कमिटीने सादर केलेल्या अहवालात असा अभिप्राय व्यक्त करण्यात आलेला आहे की कोणत्याही देशातील वेतनश्रेणीशी तुलना करता कचेरीतील पगाराचे मान फार मोठे आहे. म्हणून तिने अशी शिफारस केली आहे की १९७५ पर्यंत पगारातील बढती स्थगित करण्यात यावी किंवा अमेरिकेतील मध्यम श्रेणीतील मुलकी नोकरांच्या पगारापेक्षा १५ टक्के अधिक पगार असेल त्यांची पगारवाढ थांबवावी. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या कचेरीतील पगार बडे असल्याची ख्याती आहेच. पण समितीला असे आढळून आले की न्यूयॉर्कमध्ये काम करणाऱ्या विवाहित पण अपत्यहीन अमेरिकन सरकारी नोकरांपेक्षा कचेरीतील नोकरांचे पगार १८ ते ३५ टक्क्यांनी अधिक आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या न्यूयॉर्क येथील कचेरीत काम करणारे ६ हजार नोकर आहेत. पगार गोठविण्याच्या शिफारशीमुळे हा सर्व नोकरवर्ग चांगलाच रागावलेला आहे.

---

## रुपयाची किंमत १९४९ च्या मानाने आता ४२·४ पैसे

भारतीय रुपयाची क्रयशक्ती १९४९ च्या मानाने १९७२ च्या पहिल्या सहा महिन्यात ५७·४६% ने कमी झाली आहे. म्हणजे, १९४९ मध्ये ती १०० होती असे मानले तर ती आता फक्त ४२·४ एवढीच आहे.

उपभोग्य जिनसांच्या किमतीचा इंडेक्स नंबर १९४९ मध्ये १०१ होता, तो आता २३६ वर गेला आहे.

१९४८ मधील रुपयाला परदेशीय चलन जेवढे मिळत होते, त्याच्या मानाने आता खालीलप्रमाणे मिळू शकते. ऑस्ट्रेलिया २८·६%, कॅनडा ५६·२%, फ्रान्स २८·३%, जर्मनी ६४·६%, इटली ४८·५%, जपान ३१%, थायलँड ५०·४%, ग्रेट ब्रिटन ३९·२%, अमेरिका ५९·१% आणि युगोस्लाव्हिया २३·४%.

---

## अवर्षणाचा उसाच्या पिकावर परिणाम

पावसाचे अभावी महाराष्ट्रातील उसाचे निम्मे पीक गेल्यासारखेच आहे, असे मत डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्टस असोसिएशनने व्यक्त केले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील उसाला अवर्षणाची विशेष झळ लागली आहे.

---

# स्वातंत्र्याचा २५ वा वर्धापनदिन

## पंतप्रधान, श्रीमती इंदिरा गांधींचा संदेश

स्वातंत्र्याशी केलेला संकेतपालनाचा २५ वा वर्धापनदिन आपण या महिन्यात साजरा करत आहोत. या पाव शतकात कसोटीचे व आव्हानाचे अनेक प्रसंग उद्भवले, परंतु त्यावर देशाने मात केली. आपले ध्येय साध्य करण्यासाठी अधिक बलिष्ट व एकसंघ होऊन अधिक निश्चयाने देश या दिव्यातून बाहेर पडला.

लोकशाही आता दृढमूल झाली आहे आणि आपले कर्तृत्वही तिने सिद्ध करून दाखविले आहे. परंतु आर्थिक स्वावलंबन आणि सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनात सुधारणा या रूपात आर्थिक स्वातंत्र्य मात्र अजून मिळवावयाचे आहे.

दारिद्र्य व विषमता या विरुद्धच्या लढ्यात आपणा सर्वांनाच संघटित प्रयत्न करावयास हवेत. सर्वसामान्य जनतेची श्रद्धा होती आणि मनापासून स्वातंत्र्ययुद्धात ते सामील झाले म्हणूनच राजकीय स्वातंत्र्य मिळविता आले. आपले उद्दिष्ट सुस्पष्ट व असंदिग्ध आहे. परंतु एवढ्या बिकट परिस्थितीत व इतक्या प्रचंड स्वरूपाचे कार्य दुसऱ्या कोणत्याही देशाने आतापर्यंत हाती घेतले नसल्यामुळे आपला मार्ग आपण निश्चित आखून घेतला पाहिजे आणि ज्ञात–अज्ञात अडचणींना तोंड देण्याची तयारी ठेवली पाहिजे.

नवीन सर्जनशील समाज-निर्मितीच्या वाटचालीत आत्मविश्वास नि धैर्य हे आपले साथीदार म्हणून राहू द्यात. या नवसमाजात सर्वांना न्याय आणि समान संधी मिळण्याची हमी राहील, प्रत्येक नागरिक कर्तृत्वाच्या सर्वोच्च पातळीपर्यंत पोहोचू शकेल, सर्व स्त्री-पुरुष लोकशाही कारभारात सहभागी होतील आणि आपल्या देशबांधवांबद्दल असलेल्या जबाबदारीचीही तेवढीच जाणीव ठेवतील.

---

## नवे अमेरिकन बोलपट लवकरच येऊ लागणार

३१ मार्च, १९७२ रोजी अमेरिकन बोलपटांच्या आयातीची बंदी अमलात आली. त्यामुळे, गेल्या चार-साडे चार महिन्यांत ३१ मार्चपूर्वी आयात झालेलेच बोलपट दाखविले गेले. आता इंडियन मोशन पिक्चर्स एक्सपोर्ट कॉर्पोरेशन ह्या सरकारी मालकीच्या कंपनीने इंग्रजी भाषेतील किंवा इंग्रजीमध्ये डब केलेले ५३ बोलपट आयात करण्याची व्यवस्था केली आहे. "बोलपट-खरेदीत आपण बरीच काटकसर केली असून कमी दर्जाचे बोलपट खरीदले नाहीत; अनेक देशातील उच्च दर्जाचे बोलपट इंग्रजीमध्ये डब करून ते केवळ ४० हजार रुपयांनाही आम्ही मिळविले आहेत" असा कॉर्पोरेशनचा दावा आहे.

# स्थैर्य ही वस्तू दुर्मीळ झाली आहे काय?

## उद्योगधंद्यावर आणि त्याच्या घटकांवर विपरीत परिणाम

लेखक : सु. वि. मेहेंदळे, बी. ई., एम. बी. ए.

एका लोकप्रिय नवोदित सिनेनटीला एका मुरब्बी वार्ताहराने एका समारंभप्रसंगी गाठून प्रश्न केला, "आपल्या विवाहाची बातमी छापण्यास आम्ही वार्ताहर फार उत्सुक आहोत; केव्हा मिळेल ही गोड बातमी आम्हांला?" या नटीच्या विवाहासंबंधी अनेक उलटसुलट वार्ता प्रसिद्ध होत होत्या. अनेक नटांशी—तिच्यापेक्षा वयाने फार मोठ्या असलेल्याही—तिचे नाव जोडले जात होते. काही बातम्यांतून सिनेक्षेत्रातील लेखक, संगीत, दिग्दर्शक, तसेच मोठ्या उद्योगपतींची मुले, संस्थानिकांची मुले, यांची नावेही या प्रकरणात जाहीर होत असत. या नटीचा खाजगी रीत्या साखरपुडा झाल्याचेही काहींनी प्रश्नचिन्ह टाकून छापून दिले होते. यामुळे या प्रश्नाविषयी तिचे उत्तर महत्त्वाचे मानले जात होते. त्या नटीने विनयाने खुलासा केला,

"मी लग्न करणार हे नक्की! तशा मला अनेकांच्या मागण्याही आहेत व मलाही कांही तरुणांत 'इंटरेस्ट' वाटतो. पण नेमके कोणाशी लग्न करावे याचा निर्णय मला घेता येत नाही. सिनेमात जसे आम्ही विवक्षित नायकाच्या प्रेमात पडल्याचे दाखवतात व तो नायक हाच इतर सर्व पात्रांत आदर्श नायक वाटतो, तसे माझे प्रत्यक्ष व्यवहारातही विचार करताना होते. अलग अलग विचार केला तर त्या त्या संदर्भात तो तो तरुण मला माझ्या आयुष्याचा जोडीदार म्हणून चांगला वाटतो पण संयुक्त रीत्या विचार केल्यास मी गोंधळून जाते व कोणताच निर्णय घेऊ शकत नाही."

वरील मुलाखतीत त्या नटीच्या मनाची अस्थिरता सहज लक्षात येते. अशा प्रकारची अस्थिरता आज आपणाला सर्वत्र बोकाळलेली दिसते. कोणत्याही क्षेत्रात स्थैर्य असे आढळत नाही व त्यामुळे या जगात स्थिर असे काही नाहीच की काय? असा संभ्रम पडतो. किंबहुना, 'अस्थिरता' हा या युगाचा युगधर्मच आहे असे वाटू लागते.

दोन महायुद्धे होऊन विनाशाची पूर्ण जाणीव झाल्यावरही जगात स्थैर्य येऊ शकले नाही. भारताच्या स्वातंत्र्याची २५ वर्षे झाली तरी आज आम्हाला राजकीय, आर्थिक, सामाजिक, कोणतेच स्थैर्य वाटत नाही.

रहाटगाडग्याप्रमाणे हे पडले, ते आले. ज्यांना पाडले, त्यांना उचलेले, ही माळ चालली आहे. 'मायबाप सरकार' म्हणून ज्यांच्याकडे जनतेने पाहायचे तेच खुर्चीवर टिकत नसतील तर काय करायचे? सध्या केंद्रात व बहुसंख्य राज्यात एकपक्षीय स्थिर सरकारे आली आहेत असे वाटू लागले तोच ज्या तऱ्हेने मंत्रीपदांचे हस्तांतर होत आहे ते पाहून सामान्य नागरिक चक्रावून जातो. सर्व व्यक्ती पारखून घेतल्यानंतरही जर मंत्री स्थिर बनू शकत नाही तर त्या मंडळाच्या निर्णयात स्थिरता कधी येणार? ते मंत्री खात्यांचा अभ्यास कधी करणार? व लांब पल्ल्याची धरणे कशी आखणार? त्यांच्या सचिवालयातील मंडळी त्यांच्या तंत्राने धोरणाची अंमलबजावणी कशी करणार?

या राजकीय अस्थिरतेची झळ देशातील उद्योगधंद्यांनाही लागते. आपल्या उद्योगाचे सुकाणू उद्योगपतींना राष्ट्राच्या उद्योगविषयक धोरणाच्या दिशेने दरवेळी हाकायचे म्हणजे फार हेलकावे खावे लागतात व अखेर भलत्याच किनाऱ्याला पोचण्याची वेळ येते. अनेक चुकीची पावले पडतात व त्यात दमछाक होते.

उदाहरणार्थ, देशाच्या आर्थिक विकासासाठी आवश्यक म्हणून काही उद्योग जाहीर होतात. त्यांची माहिती मिळवावी, त्यात गुंतवणूक करावी, असे साहजिकच साहसी उद्योगपतींना वाटते. पण त्यात बरीच शक्ती व धन खर्च केल्यावर त्यांच्या ध्यानात येते की शासनाचे धोरण बदलले आहे. तो विशिष्ट उद्योग लघुउद्योगासाठी किंवा सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवला आहे. किंवा दुसऱ्या कोणत्या तरी कायद्यान्वये या उद्योगपतींना आपला उद्योग वाढवण्यास मनाई करण्यात आली आहे.

अशा अनुभवाने हताश झालेले उद्योगपती हे दीर्घ मुदतीच्या योजना हाती घेण्यास कचरतात व आपले लक्ष थोडक्या वेळात गुंतवणुकीवर चांगला नफा देणाऱ्या उद्योगांवर केंद्रित करतात. त्यामुळे देशाला आवश्यक त्या वस्तूंचे उत्पादन कमी पडते व काही क्षेत्रात जरूरीपेक्षा उत्पादन वाढून मालाचे साठे पडून राहतात.

कालपर्यंत चांगले लाभांश देणाऱ्या व बाजारात तेजीत असणाऱ्या कंपन्यांच्या शेअरचे भाव आज कोसळत आहेत. याला देशातील अस्थिरतेचे वातावरणच कारण असावे. नाहीतर सर्व क्षेत्रात नियोजनपद्धतीने, परवाने देऊन चालू केलेले उत्पादन इतक्या थोड्या काळात निरुपयोगी किंवा बिन-किफायतशीर ठरले नसते. बऱ्याच उद्योगपतींचे आडाखे या अस्थिरतेने चुकीचे ठरवले आहेत. धंद्यातील ही अस्थिरता अधिकारी व नोकरवर्गाच्या कार्यक्षमतेवरही फार मोठा परिणाम करीत असते. एखाद्या कसबी कामगाराला त्या प्रकारचे उत्पादन थांबल्यास बेकार व्हावे लागते. या उलट दुसऱ्या ठिकाणी एखादा अकुशल कामगारही वाढता महागाईभत्ता पदरात पाडून आपले राहणीमान सुधारीत असतो. १०-१५ वर्षे काम केलेले अधिकारीही त्या त्या संस्थेत स्थैर्य नाही म्हणून चिंता करीत असतात. आपली संस्था वाढेल, आपला दर्जा वाढेल, याची त्यांना इतक्या वर्षांनंतरही खात्री वाटत नाही, याचे कारण ही अस्थिरता! त्यावर त्यांचा एकट्याचा इलाज चालत नाही. भोवतालच्या वातावरणात प्रतिकूल बदल घडत आहे असे दिसताच हा वर्ग दुसऱ्या, तेजीत चालणाऱ्या संस्थेकडे आपले लक्ष वळवतो व तेथे शिरकाव करून घेण्यास धडपडू लागतो. प्रसंगी त्याला असे करण्यास सक्तीने भाग पाडले

जाते. तिथेही परिस्थिती बदलू लागताच पुन्हा हा बेचैन होतो. सारांश, आयुष्याची महत्त्वाची वर्षे नोकरीत काढूनही या वर्गाला स्थैर्य असे लाभत नाहीच.

धंद्याचे कठीण काळात या धंद्याचे जे खरे मालक — भागधारक — तेही धीर सोडतात व मिळेल त्या पडत्या भावात आपले भाग विकून मोकळे होतात. धंद्याची ही घसरण थांबविण्यासाठी भागधारक, नोकरवर्ग, सरकार या सर्वांचा जो संयुक्त प्रयत्न घडावा तो घडत नाही. अशा वेळी असे तोट्यात चालणारे धंदे सार्वजनिक क्षेत्रातही आणले जात आहेत पण त्यामुळे नवीन प्रश्न निर्माण होतात व वातावरण अधिक अस्थिर बनते. हे धंदे जगवले जातात पण त्यात हवे तसे चैतन्य येत नाही.

एकंदरीत, स्थैर्य ही वस्तु कोणत्याही क्षेत्रात दुर्मिळ झाली आहे का ? आम्हाला आमच्या देशासाठी भावी ५ ते १० वर्षांचेही निश्चित नियोजन करता येणार नाही का ? ज्यायोगे राजकीय अस्थैर्य व त्यातून होणारे गोंधळ, मध्यावधी निवडणुकांसारखे अनाठायी खर्च टाळता येतील, धंद्यांना सूत्रबद्ध विस्तारयोजना आखता येतील, कार्यक्षम नोकरवर्गास आपापल्या क्षेत्रात अधिक कुशलता मिळवता येईल. गेल्या २५ वर्षांच्या अनुभवाने आम्ही एवढे साधले तरी खूप भले होण्यासारखे नाही का ?


---

## "योजना"ची मराठी आवृत्ती

### नियोजन मंडळाच्या वतीने प्रकाशित होणारे पाक्षिक

भारताच्या आणि भारतीय जनतेच्या आर्थिक उत्कर्षासाठी आतापर्यंत चार पंचवार्षिक योजना आखण्यात येऊन त्यांची अमलबजावणी झाली आहे. या विकासकार्याची जनतेला माहिती होऊन ती त्या कार्यात सहभागी होण्यास उद्युक्त व्हावी, या दृष्टीने १५ वर्षांपूर्वी इंग्रजी भाषेत "योजना" पाक्षिक सुरू करण्यात आले. परंतु इंग्रजी भाषा देशातील फारच थोड्यांना समजते, तेव्हा विविध प्रादेशिक भाषांत "योजना" पाक्षिक सुरू करणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन तामीळ, बंगाली व आसामी भाषेतून "योजने" ची आवृत्ती प्रसिद्ध करण्यात येऊ लागली. नुकताच मल्याळम् आवृत्ती सुरू झाली असून १ ऑगस्टपासून मराठी आवृत्तीही प्रसिद्ध होऊ लागली आहे. हे पाक्षिक नियोजन मंडळाच्या वतीने प्रसिद्ध होत असले, तरी ते नियोजन मंडळाचे वा भारत सरकारचे मुखपत्र नाही. देशापुढील आर्थिक व सामाजिक समस्यांवर त्यात खुली चर्चा व्हावी अशी अपेक्षा आहे. या मराठी पाक्षिकाचे श्री. अविनाश गोडबोले हे संपादक असून श्री. रजनीकांत प्रधान हे साहाय्यक संपादक आहेत.

---




# प्राप्तिकरदात्यावर विश्वास ठेवण्याचे नवे पर्व

## इन्कमटॅक्स खात्याचे नागरिकांना आवाहन

( श्री. व्ही. एस. महाजन, अपिलेट असिस्टंट कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स, जनता संपर्क मोहीम अधिकारी, पुणे )

कर कोणत्याही प्रकारचे असले तरी ते पुष्कळांना जाचक वाटतात. प्राप्तीकर हा तर प्राप्तीवरील कर. स्वकष्टाने मिळविलेल्या उत्पन्नाचा वाटा कररूपाने थावयास पुष्कळांना नकोसे वाटते.

### प्राप्तिकर हा प्रत्यक्ष कर

सरकारला लोकहिताची, राष्ट्रसंरक्षणाची फार मोठी जबाबदारी घ्यावी लागते. त्यासाठी लागणारा पैसा, मुख्यत्वे कररूपाने उभा होतो. कर हे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असे दोन प्रकारचे असतात. प्रत्यक्ष करामुळे एकूण करांच्या अंदाजे १६ टक्के उत्पन्न होते. प्रत्यक्ष करात प्रमुख कर प्राप्तिकर. हा कर भरणारे देशात २ टक्के लोक आहेत. महाराष्ट्रातील मुंबई, विदर्भ व मराठवाडा भाग सोडून इतर १२ जिल्ह्यांकरिता प्राप्तिकर विभाग असून त्यासाठी एक प्राप्तिकर आयुक्त आहेत. त्यांचे मुख्य कार्यालय पुणे येथे असून त्यांच्या हाताखाली १०३ प्राप्तिकर अधिकारी आहेत. साधारणतः प्रत्येक जिल्ह्यास एक प्राप्तिकर कार्यालय असून तेथे आवश्यकतेप्रमाणे एक अगर अधिक प्राप्तिकर अधिकारी असतात. प्राप्तिकर आयुक्त, पुणे, यांच्या अधिकार कक्षेतील वरील जिल्ह्यात मिळून सुमारे १,८२,००० करदाते आहेत.

### कर देणे म्हणजे सामाजिक ऋणाची परतफेड

प्राप्तिकर चुकविण्याची वृत्ति आढळण्याचे प्रमुख कारण तो कर का थावयाचा याची भूमिका नागरिकांच्या मनात नीट ठसलेली नसते. पुष्कळांना असे वाटते की कराचे जादा प्रमाण हे कर चुकविण्याचे कारण आहे. अर्थात हा वादाचा विषय होऊ शकेल. एक गोष्ट खरी की कर चुकविणे ही एक प्रवृत्तीच आहे. काहीजण कर समाजसुव्यवस्थेचा, राष्ट्रसंरक्षणाचा मोबदला समजतात तर काहीजण कर हे सरकारला दिलेली देणगी समजतात. कर देणाऱ्या लोकांना, त्यांना अपेक्षित मोबदला सरकारकडून न मिळाल्यास अगर कररूपी देणगीची सरकारने जाणीव ठेवली नाही असे वाटल्यास आपण कर देतो ती फार चूक करतो असे वाटते व कर चुकविण्याची प्रवृत्ती वाढीस लागते. कर हे मोबदला नाहीत व देणगी तर त्याहूनही नाही. कर देणे म्हणजे सामाजिक ऋणाची परतफेड. ज्या समाजावर आपण कमाईसाठी अवलंबून असतो त्या समाजाची समृद्धी म्हणजे पर्यायाने आपली समृद्धी. त्या समाजातील अविकसित घटकांची उन्नती झाल्यास सर्वांचाच फायदा होणार असतो. त्या दृष्टीने मिळविलेल्या उत्पन्नाचा भाग आपल्या सामाजिक ऋणाची फेड म्हणून दिला पाहिजे. कर भरणे ही कर्जाची परतफेड समजली की मग त्या मोबदल्यात काही मिळावे ही अपेक्षा राहणार नाही. उलट कर्जाची फेड केल्याने मानसिक स्वास्थ्यच मिळेल.

### समरी असेसमेंट : विश्वासाचे वातावरण

कर आकारणी व करवसुली ही प्रमुख कामे प्राप्तिकर अधिकारी करतात. दरवर्षी मिळालेले उत्पन्न करपात्र असल्यास प्राप्तिपत्रक आपणहून भरावे, अशी कायद्यात तरतूद आहे. व्यक्ती, न नोंदलेली भागिदारी, असोसिएशन अशांचे उत्पन्न रु. ५०००-०० च्या वर असल्यास, नोंदलेल्या भागीचे उत्पन्न रु. १०,०००-०० चे वर असल्यास, करपात्र असते. प्राप्तिपत्रक भरल्यावर त्याची छाननी होते. मिळालेले उत्पन्न, मागितलेल्या सवलती व वजावटी सिद्ध कराव्या लागतात. कायद्याच्या या तरतुदीमुळे गेली कित्येक वर्षे प्रत्येक करआकारणीसाठी करदात्यांना कार्यालयात हजर राहावे लागे. शिवाय पुष्कळ गोष्टी सिद्ध करावयाच्या असल्याने करदात्यांच्या मनात आपल्यावर खात्याचा विश्वास नाही अशी भीती निर्माण झाली होती. या भीतीपोटी पुष्कळ करदाते प्राप्तिपत्रक भरण्याचे टाळीत अगर खरे उत्पन्न दाखविण्याची त्यांना भीती वाटे. कारण दाखविलेल्या उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न धरले जाईल असे त्यांना वाटे. हे वातावरण दूर होणे आवश्यक होते. करदात्यांवर काही बाबतीत विश्वास टाकल्यास व त्या बाबतीत कायदेशीर पुराव्याच्या अटी शिथिल केल्यास करदाते सुद्धा मनमोकळेपणाने व तसेच खरेपणाने वागतील अशी अपेक्षा बाळगून गेल्या वर्षापासून खात्याने संक्षिप्त करआकारणी ( समरी असेसमेंट ) पद्धत सुरू केली. या पद्धतीप्रमाणे विशिष्ट मर्यादेपर्यंतची पत्रके जशीच्या तशी स्वीकारली जाऊ लागली. फक्त सकृद्दर्शनी पत्रकात काही चूक असेल, काही सवलती मागावयाच्या राहिल्या तर तेवढी दुरुस्ती करून करदात्यास कार्यालयात न बोलाविता आकारण्या पूर्ण झाल्या. पुणे विभागात गेल्या वर्षी सुमारे १,६७,००० आकारण्या म्हणजे एकूण आकारणीच्या ६५ टक्के प्रमाणात वरील पद्धतीने पुऱ्या झाल्या. हे प्रमाण सर्व देशात या वर्षापासून ७५ टक्के पर्यंत न्यावयाचे धोरण आहे. तसेच संक्षिप्त करआकारणी झाल्यास, अगदीच काही विशिष्ट कारण असल्याखेरीज पुन: ती आकारणी परत नव्याने होण्याची शक्यता सहसा नसते.

### करदात्यांचे काम सुलभ : काही पथ्ये

वरील नवीन धोरणामुळे करदात्यांचे काम आता फार सुलभ झाले आहे. मात्र काही पाळावयाची पथ्ये सांगणे आवश्यक आहे. पहिले म्हणजे प्राप्तिपत्रक वेळेवर भरा. दरवर्षी ३० जून ही त्यासाठी शेवटची तारीख. धंद्याचे उत्पन्न असून, हिशोबाचे वर्ष ३१ डिसेंबरनंतर संपल्यास ३१ जुलै ही शेवटची तारीख. आकारणी वर्ष १९७२-७३ या वर्षाकरिता मात्र ज्यांची तारीख ३० जून होती अशांची प्राप्ति व संपत्तिपत्रके भरण्याकरिता ३१ जुलै १९७२ पर्यंत मुदत वाढविली आहे. पत्रक भरल्यावर ३० दिवसांच्या आत स्वतःच त्यानुसार स्वआकारणीने ( सेल्फ असेसमेंट ) येणारा कर रु. ५००-०० च्या वर असल्यास स्वतःहून भरावा. कर कापल्याबाबतची सर्टिफिकिटे व अगाऊ कर भरला असल्यास कर भरलेल्या चलनाचा भाग पत्रकाबरोबर

जोडावा. पगारदार व्यक्तीने पगाराचे व डिव्हिडंड अगर व्याज मिळणाऱ्या व्यक्तीने त्याबाबतचे प्रमाणपत्र, धंदेवाईक लोकांनी नफातोटापत्रक, ताळेबंद द्यावेत. सर्व कागदपत्र न जोडल्यास तुम्हांस न बोलविता आकारणी करणे कठीण होईल. कागदपत्र व्यवस्थित फाईल करता यावे यासाठी खात्याने कायम खाते क्रमांक दिले आहेत. त्या क्रमांकांचा निर्देश आपापल्या सर्व कागदपत्रांवर नेहमी करावा वाटल्यास त्याचा रबरी शिक्का करून घ्यावा.

व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न रु. १०,०००-०० व नोंदलेल्या भागीचे उत्पन्न रु. ३०,०००-०० च्या वर असल्यास अगाऊ कर (अॅडव्हान्स टॅक्स) भरावा लागतो. आकारणी पूर्वीपासून होत असल्यास त्याची नोटीस येते. आकारणी होत नसल्यास असा अगाऊ कर वरील मर्यादेपेक्षा उत्पन्न जास्त झाल्यास आपणहून अंदाजपत्र (एस्टिमेट) दाखल करून भरावा लागतो.

वर उल्लेखिलेल्या गोष्टीत दक्षता घेतल्यास, आकारणी झाल्यानंतर येणारा कर नोटीस मिळाल्यापासून ३० दिवसांत भरला म्हणजे झाले. अगाऊ कर जास्त भरल्यास रिफंड मिळतो. नेहमीची आकारणी लांबल्यास तात्पुरती आकारणी करून असा रिफंड दिला जातो.

**करवसुलीप्रमाणे कररिफंडमध्ये खात्याची जागरूकता**

करवसुली, कररिफंड या दोन्ही बाबतीत आयकर खाते जागृत आहे. गेल्या वर्षी करवसुलीचे काम खास प्रयत्न करून पुणे विभागाने २२ कोटी, ६२ लाख रुपये इतक्या वसुलीचा उच्चांक निर्माण केला. त्याचप्रमाणे चुकीची डिमांड नोटीस अगर वसुली होण्याचे प्रकार काही विशिष्ट पद्धती सुरू करून खूपच कमी केलेले आहेत. रिफंडच्या एकूण ४,०९५ प्रकरणांपैकी ३९०३ प्रकरणे म्हणजे ९६ टक्के प्रकरणे निकाली काढून रिफंड दिले आहेत.

**व्याजाच्या व दंडाच्या तरतुदी**

करदात्यांच्या अडचणी सोडविण्याचे व त्यांना माहिती देण्याचे काम प्रत्येक जिल्ह्यातील प्राप्तिकर कार्यालयातील 'ए' वॉर्डचे अधिकारी व पुणे येथे जनता संपर्काधिकारी बघतात. सर्व करदात्यांनी सहकार्याने वागल्यास करआकारणीस व वसुलीस कोणतीच अडचण येत नाही. मात्र मुदतीबाहेर पत्रके दिल्यास उशिराच्या काळाचे दराच्या १२ टक्के व्याज दरसाल द्यावे लागते. मुदत घेतली तरीही व्याज द्यावे लागते. तसेच दरमहा २ टक्के असा जास्तीत जास्त ५० टक्क्यांपर्यंत दंड होतो. उत्पन्न लपविल्यास अगर चुकीची माहिती दिल्यास कमीत कमी लपविलेल्या उत्पन्नाइतका व जास्तीत जास्त त्याच्या दुप्पट दंड होतो. शिवाय फौजदारी होऊ शकते. अगाऊ कर आपणहून न भरल्यास, अगर खोटे अंदाजपत्रक दिल्यासही दंड होतो.

**अजाणतेपणाच्या प्रमादांना सहानुभूती**

मात्र केवळ अजाणतेपणाने वरील प्रमाद घडल्यास अगर पश्चात्ताप होऊन एखाद्यास त्याची भरपाई करणे झाल्यास स्वखुशीचे प्रकटीकरण (व्हॉलेंटरी डिस्क्लोजर) करता येते. या प्रकटीकरणात सर्व उत्पन्न व व्यवहार अचूक दाखविल्यास, ते स्वखुशीने व खात्याच्या ध्यानात तो प्रमाद येण्याच्या आत केल्यास, त्याच्या चौकशीबाबत सहकार्य देऊन येणारा कर ताबडतोब भरल्यास, प्राप्तिकर आयुक्त होणारा दंड कमी करू शकतात अगर रद्द करू शकतात. अशा बाबतीत सहानुभूतीचेच धोरण असते. पुणे विभागाने गेल्या वर्षी आलेल्या एकूण प्रकटीकरणातील दोनतृतीयांश प्रकटीकरणे स्वीकारून त्या बाबतीत होणाऱ्या दंडाची रक्कम संपूर्णपणे माफ करण्यात अगर कमी करण्यात आली, याचा येथे विशेष उल्लेख करावासा वाटतो.

आम्ही आपल्यावर विश्वास दाखविण्याचे नवीन पर्व सुरू केले आहे. त्यास आपणाकडूनही प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा ठेवतो. आपल्या विकसनशील राष्ट्राच्या उभारणीकरिता सर्वांच्या सहकार्याची गरज आहे.

एकमेकां साहाय्य करूं अवघे धरूं सुपंथ.

---

**विजेची टंचाई पडण्याचा इशारा**

लोकसभेत एका सभासदाने देशात वारंवार उद्भवणाऱ्या विजेच्या टंचाईकडे सरकारचे लक्ष वेधले. टंचाईची परिस्थिती पुन्हा पुन्हा का उद्भवते असा प्रश्न सभासदाने विचारला असता वीज व पाणीपुरवठामंत्री श्री. के. एल्. राव म्हणाले की येत्या दोन वर्षांत देशाला २० ते ३० लाख किलोवॅट विजेची टंचाई सहन करावी लागणार आहे. सध्या काही विद्युत्‌निर्मिती केंद्रांची उभारणी चालू आहे. परंतु त्यांची उभारणी होऊन त्यांमधून पुरेशा प्रमाणात वीज निर्माण होऊ लागण्यास १९७४ साल उजाडेल. वीज ही अशी एक वस्तू आहे की जिच्या निर्मितीबरोबरच तिची गरजही वाढत जाते. त्यामुळे पुरवठ्यापेक्षा विजेची गरज नेहमीच जास्त असते. तथापि टंचाईचे हे एकच कारण नाही. काही राज्यांतून विजेच्या उत्पादन केंद्रापासून गरजेच्या ठिकाणी वीज पुरविण्याची व्यवस्था अपुरी असते. हीच परिस्थिती राज्याराज्यांमधील वीजपुरवठ्याबद्दलही कधीकधी दिसून येते. वीजनिर्मिती केंद्राच्या उभारणीचे काम मंदगतीने चालू असल्याचे काही ठिकाणी आढळून येते; उभारणीच्या कामासाठी लागणारी साधनसामग्री पुरविणारे कारखाने ती वेळच्या वेळेला पुरवीत नाहीत. शिवाय पोलाद आणि सिमेंट ह्यांचा अपुरा पुरवठाही केंद्रांची उभारणी झपाट्याने होण्याच्या आड येते. चालू वीजनिर्मिती केंद्रांतूनही पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती होत नाही. ह्याचे कारण अकार्यक्षमता हे नसून अननुभव आहे. अनुभवात भर पडेल तसतशी सुधारणा होत जाईल.

---

### तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी रशिअन यंत्रसाहित्य

इंडिअन ऑईल कंपनी ही मथुरा येथे तेलशुद्धीचा एक मोठा कारखाना काढणार आहे. अजून कारखान्यासाठी जागेची निवड करण्यात आलेली नाही. निवड समिती सध्या जागांची पाहणी करीत आहे. मथुरा येथील कारखान्याची उत्पादनक्षमता ६० लाख टनांची असणार आहे. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री रशिआकडून कोणती व किती मिळू शकेल हे पाहाण्यासाठी कंपनीच्या तज्ज्ञांचे एक मंडळ रशिआचा दौरा करून परत आले आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १०० कोटी रुपये भांडवल लागणार आहे. शक्य तितकी यंत्रसामग्री भारतात तयार झालेलीच वापरण्यात येणार असली तरी अनेक प्रकारची यांत्रिक अवजारे परदेशातून आयात करावी लागणार आहेत. आयात कराव्या लागणाऱ्या सामग्रीचे प्रमाण ५० टक्क्यांच्या जवळपास आहे. त्यापैकी किती यंत्रसाहित्य रशिआकडून घ्यावयाचे ह्याबद्दल लवकरच निर्णय घेण्यात येईल. मथुरा येथील कारखान्यात उत्पादनाची वेगळी पद्धत वापरण्यात येणार आहे. त्यासाठी लागणारी साधने आणि तांत्रिक ज्ञान ह्यांची आयात करावी लागणार आहे. पण ही पद्धत रशिआत प्रचलित नसल्याने ह्याबाबतीत रशिआचा उपयोग होण्यासारखा नाही. त्यासाठी पाश्चिमात्य देश अगर रुमेनिआ ह्यांचीच मदत घ्यावी लागेल. हिंदी महासागराच्या किनाऱ्यापासून मथुरेपर्यंत नळ टाकून अशुद्ध तेलाचा पुरवठा करण्यात यावयाचा आहे. हा नळ पश्चिम किनाऱ्यावरील कोठल्या बंदरापासून टाकावयाचा ह्याविषयी कंपनीला पाहणी करावी लागेल.

---

### कमी झोपणारे तरुण अधिक कार्यक्षम

झोप ही माणसाच्या जीवनातील एक अमोघ शक्ती आहे. शरीराला व बव्हंशी मनालाही पूर्ण विश्रांती देऊन दोन्ही पुन्हा ताजीतवानी करण्याची किमया फक्त झोपच करू शकते. अमेरिकेतील मानसशास्त्रज्ञांनी माणसाला येणाऱ्या झोपेचा आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा काही संबंध आहे काय ह्याविषयी प्रयोग केले आहेत. प्रयोगांती त्यांना असे आढळून आले की जी तरुण माणसे थोडी झोप घेतात ती उत्साहाने मुसमुसलेली, महत्त्वाकांक्षी आणि कार्यक्षम असतात. ती कामही अंग मोडून करतात व सतत काहीतरी उद्योगात मग्न असतात. उलटपक्षी जे तरुण लोक ९ तासांपेक्षा अधिक झोपतात ते लवकर चिंताग्रस्त होतात आणि त्यांच्यावर निराशेची छाया लवकर पडते. त्यांना स्वतःविषयी कधीच खात्री वाटत नाही. आपला उद्योगधंदा निवडण्यास ते असमर्थ ठरतात. अगदी सूक्ष्म प्रमाणात का होईना, पण ते मानसिक रोगाने पछाडलेले दिसून येतात. काही तर उघड उघड काळजीत बुडालेले दिसतात. उलट, जी तरुण माणसे रोज रात्री ६ तास अगर त्यापेक्षा कमी झोप घेतात ती आपली कामे तत्परतेने करतात. त्यांच्या कामाच्या बाबतीत त्यांना अडचणी कमी येतात आणि आल्या तरी त्या जाणवत नाहीत. म्हणजेच त्यांचे धंदेवाईक अगर नोकरीचे जीवन सुरळीतपणे चाललेले असते. झोपाळू माणूस स्वतःला व दुसऱ्याला हळूहळू भारभूत होत जातो असा अनुभव सर्वत्रच येत असतो.

---

### कॅनडात भारतीय संस्कृतीचे केंद्र

भारताच्या स्वातंत्र्याची रौप्य ज्युबिली कॅनडात साजरी केली जाणार आहे. ह्या शुभ दिवशी त्या देशातील टोरोंटो ह्या शहरी भारतीय संस्कृतीचे एक केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. हिंदी संस्कृतीची कॅनडातील लोकांना ओळख करून देण्याचा हा प्रयत्न आहे. केंद्रासाठी शहरातील एक जुनी इमारत ८० हजार डॉलर्सना विकत घेण्यात आली आहे. कॅनडात स्थायिक झालेल्या हिंदी लोकांचे विवाहादी समारंभ साजरे करण्यासाठी त्याचा उपयोग करण्यात येईल. कॅनडात सुमारे २० हजार हिंदी लोक आहेत. ह्या केंद्रात योग, नृत्य, संगीत आणि हिंदी व इतर भारतीय भाषांचे वर्ग चालविण्यात येतील. केंद्र १५ ऑगस्ट-पासून कार्य करू लागेल.

---

### जपान सर्वांत अधिक केळी आयात करतो

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती संघटनेने १९७२ मधील केळ्यांची मागणी व पुरवठा ह्यासंबंधी एक अहवाल तयार केला आहे. अहवालात अशी माहिती देण्यात आली आहे की सर्व जगात जपान हा देश सर्वांत अधिक केळी आयात करतो. गेल्या वर्षी त्या देशाने ९ लाख, ८९ हजार टन केळी आयात केली. १९७० च्या मानाने ही आयात १७·२ टक्क्यांनी अधिक आहे. इतके असूनही जपानमधील लोकांची केळ्यांची भूक वाढतच चालली आहे. विशेष म्हणजे बहुतेक सर्व आयात दक्षिण अमेरिकेतील इक्वेडोर ह्या देशाकडून केली जाते. १९६९ सालापर्यंत जपानला खूपच जवळ असलेल्या तैवान अथवा फोर्मोसा ह्या देशाकडून आयात केली जात असे. इक्वेडोर देशात जपानी लोकांना आवडणाऱ्या केळ्यांची लागवड फार मोठी होत आहे.

---

### संयुक्त मालकीच्या परदेशातील कारखान्यांना नफा

भारत सरकारने परदेशात संयुक्त मालकीचे १३५ कारखाने काढण्यास मंजुरी दिलेली आहे. त्यांपैकी ३२ कारखान्यांत उत्पादन चालू झाले असून ६४ कारखाने उभारण्याच्या निरनिराळ्या अवस्थांत आहेत. काही कारखाने १९६९ मध्ये व काही नंतर उत्पादन करू लागले आहेत. अशा कारखान्यांपासून भारताला ५० लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची नफ्याच्या रूपाने प्राप्ती झाली आहे. त्याशिवाय ५८·७ लाख रुपये सल्ला देण्याबद्दल फी म्हणून मिळाले आहेत. ह्या कारखान्यांमुळे भारतामधील यंत्रसामग्रीची व तंत्रज्ञांची निर्यात करण्यास वाव मिळाला आहे. त्या निमित्ताने भारताला ४·२ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. कारखाने उत्तरोत्तर अधिक लाभदायक ठरतील.

# अधिकाऱ्यांचे फतवे;
# एक काटकसरीची बाब !

( लेखक : विजय गोखले )

संस्था सरकारी, निमसरकारी वा खाजगी असो, व्यवहारासाठी दररोज किती तरी फतवे काढले जात असतात, त्यात खरोखर किती कामाचा भाग लिहिला जातो ह्याची बारकाईने पाहणी केल्यास हा सर्व अवाढव्य उद्योग किंवा उपद्व्याप निरर्थक आहे असे लक्षात येईल.

एका संस्थेने प्रयोग म्हणून व्यवहारासाठी पाठवलेले व आलेले कागद एकत्र केले तेव्हा त्या कागदाची उंची संस्थेच्या इमारती-एवढी झाली व अशा कागदांतून संस्थेचा व्यवहार काही लाखांतच झालेला होता. निरर्थक कागदांची ये-जा घटणार कशी म्हणून एका संस्थेने संस्थेतील अंतर्गत पत्रव्यवहारासाठी जो कागद छापला जातो, तो छापलाच नाही. त्यामुळे वर्षाकाठी काही लाखांत पैसे वाचले. अर्थात् त्याचे काम अडले का ? मुळीच नाही; उलटपक्षी अधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष संबंध येऊन परस्पर-सलोख्याचे संबंध वाढले आणि धंदाही वाढला. घटकाभर ही उदाहरणे अतिशयोक्तीची आहेत असे धरले तरी त्यातील मथितार्थ निश्चितच महत्त्वाचा आहे हे ध्यानात घावयास हरकत नसावी.

तसे पाहता फतव्यांचा उपयोग काय, असे विचारले तर दोन महत्त्वाच्या गोष्टी डोळ्यांपुढे येतात. एकतर असा फतवा माहितीकरिता अवलोकनार्थ पाठवला जातो किंवा माझी जबाबदारी येथे संपते; पुढील तजवीज तुमच्यावर सोपवली आहे; असे कळविण्यासाठी असतो. खरोखरच कोणाची जबाबदारी कोठे संपते वा कोठे सुरू होते हे त्याला दिलेल्या अधिकार-पत्रकावरून समजून येणार नाही का ?

जितक्या व्यक्ती तितक्या संस्था असा विचार केलात तर दररोज कागदावर खरडणे, छापणे त्याच्या प्रती काढणे किती होत असेल ह्याची कल्पनाच करवत नाही. फतवे काढणे हे कशासाठी करत असतात हे लक्षात आल्यावर एक गोष्ट निश्चित ध्यानात यावी की दुसऱ्याने केलेल्या कार्यावर वा त्यावर सोपविलेल्या कार्यावर विश्वास नसणे ह्याचे हे निदर्शक होय किंवा मी किती कार्य केले हे ह्या फतव्यावरून मोजमाप करावे असेहि सुचविण्याचे साधन होय ! नोकरीवरून निकालात निघत असलेल्या एका अधिकाऱ्याने वरिष्ठांपुढे त्यांनी केलेल्या या कामाच्या कागदाचा ढीग आणून ठेवला. त्याचेवर नजर टाकून वरिष्ठांनी त्याला सांगितले की ह्याचमुळे मी तुमची रवानगी करत आहे ! असो, ह्याचा अर्थ फतवे काढूच नयेत असा नसून योग्य व मोजके लिखाण व ज्यांना त्यात जाणून घेण्याची इच्छा आहे अशाकडेच त्याची रवानगी केल्यास हा अपव्यय टळणार नाही का ?

---


## दि पूना डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणे.

भारतीय स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सवी रुपेरी दिवस ! भारतीय स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात स्वखुषीने दिलेल्या अनेकांच्या आहुतीतून निर्माण झालेले स्वातंत्र्य आज पंचवीस वर्षांचे होत आहे. आहुती दिलेल्या ज्ञात-अज्ञात वीरांच्या मंगल स्मृतीस शतशः प्रणाम ! !

स्वातंत्र्यानंतरच्या पंचवीस वर्षांच्या कालखंडात देशाची जी आर्थिक, औद्योगिक, सामाजिक प्रगती झाली, त्यांत सहकाराचा सिंहाचा वाटा आहे.

जिल्ह्यातील शेती, सहकारी साखर कारखाने, औद्योगिक सहकारी व्यवसाय, त्याचप्रमाणे समाजातील दुर्बल घटक यांना कर्ज पुरवठा करून, बँकेने जिल्ह्याच्या प्रगतीचा वेग कायम राखला आहे.

जिल्ह्याची अधिकाधिक सेवा करण्याची प्रतिज्ञा या रौप्यमहोत्सवी स्वातंत्र्यदिनी आम्ही करीत आहोत !

बँकेचे असंख्य ठेवीदार, सभासद, यांना या मंगल प्रसंगी शुभेच्छा !

व. रा. कोतवाल, उपाध्यक्ष — रा. वा. घोलप, अध्यक्ष

व्ही. सी. गरूड, व्यवस्थापक — बा. रा पाटील, कार्यकारी संचालक

## THE UGAR SUGAR WORKS LTD.

**Registered Office :**
Vakhar Bhag, Sangli.
( Maharashtra State )
Phone—191

**Factory Office :**
**P. O. Ugarkhurd.**
( Dist. Belgaum,
Mysore State )
Phone—Sangli 187
Grams—
"UGARSUGAR"

**Manufacturers of :**

1. White Crystal Sugar of all grades.
2. Quality Industrial Alcohol.
3. Quality Indian Made Foreign liquors, first in India to get I. S. I. Certification Mark.

The present crushing capacity of the factory is 2,000 M. tonnes of cane per day.

The shares of the Company are listed on the Bombay and Bangalore markets.

## छोट्या शेतांना महत्त्वाची कामगिरी करता येईल

जागतिक बँकेने शेतीच्या विकासासंबंधी एक अभ्यासपूर्ण प्रबंध तयार केला आहे. ह्या प्रबंधात छोट्या शेतांना आर्थिक विकासात काय कामगिरी करता येईल त्याचा विशेष विचार करण्यात आला आहे. प्रबंधात गोळा करण्यात आलेल्या माहितीवरून असे दिसून येते की जगातील अविकसित देशांच्या एकूण लोकसंख्येपैकी एकतृतियांश लोक मागासलेल्या अवस्थेत जीवन कंठीत आहेत. चीन सोडला तर अशा दारिद्र्यपीडित लोकांची संख्या ७० ते ८० कोटी इतकी प्रचंड आहे. ह्या लोकांचे राहणीचे मान व इतर लोकांचे राहणीचे मान ह्यांत फार फरक आहे आणि हा फरक कमी करण्यासाठी कसोशीचे प्रयत्न करण्यात आले नाहीत तर तो आणखीच वाढत जाईल अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. भारतात जमीनधारणेसंबंधीचे कायदे राज्यसरकारे करीत आहेत अगर करणार आहेत. जमिनीच्या धारणपद्धतीत सुधारणा करण्यात आल्याशिवाय अर्थव्यवस्था विकास पावणार नाही हे आता सर्वमान्य झालेले आहे. विकास घडवून आणण्यात छोट्या शेतकऱ्यांना काय व कशी कामगिरी करता येईल ह्याचा विचार बँकेच्या प्रबंधात करण्यात आलेला आहे म्हणून भारताच्या दृष्टीने त्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात उत्पादनवाढ, निर्यातवाढ आणि रोजगारीत भर ह्यांना जसे महत्त्व आहे तसेच उत्पादनाच्या वाटणीलाही आहे. अर्थात विकासाची ही उद्दिष्टे साध्य करणे सहजसाध्य नाही. ती साध्य करण्यासाठी छोट्या शेतांच्या विभागाला महत्त्वाचे कार्य करता येण्यासारखे आहे असे प्रबंधात प्रतिपादन करण्यात आले आहे. समाजातील आर्थिक दृष्ट्या मागासलेल्यात ग्रामीण विभागांतील तीन थरांतील लोकांचा समावेश होतो. छोटे शेतकरी, भूमिहीन मजूर आणि बेकार हे ते तीन थर होत. ग्रामीण भागातील दरिद्री लोकांत त्यांचीच संख्या अधिक असते. ह्या लोकांना आर्थिक विकासाचा काही फायदा मिळणार नसेल तर त्याला फारच थोडा अर्थ राहील. विकासात त्यांना सहभागी करून घेण्याचे काम सहाजिकच फार प्रचंड आहे. जागतिक बँक आपल्या परीने अविकसित देशांतील शेतीच्या विकासाला साह्य करण्याची उमेद धरून आहे. जून १९७३ अखेर संपणाऱ्या ५ वर्षांच्या काळात अविकसित देशांतील शेतीच्या विकासासाठी २४० कोटी डॉलर्स कर्ज बँककडून मिळालेले असेल. त्या पूर्वीच्या पाच वर्षांतील कर्जापेक्षा ही रक्कम चौपट अधिक असेल. त्या पुढील पाच वर्षांत म्हणजे १९७८ च्या जून अखेरपर्यंत बँकेकडून ह्याच कामासाठी ४४० कोटी डॉलर्स कर्ज देण्याचा विचार चालू आहे. १९६० पासून बँकेकडून शेतीच्या विकासासाठी देण्यात येणाऱ्या कर्जाच्या व्यवहारात अधिकाधिक विविधता येत चालली आहे.

---


# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी : ९ बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी : महाल, नागपूर

| सांपत्तिक स्थिती | १०-६-१९७१ रोजी |
|---|---|
| १. भांडवल व निधी | रु. १८८५ लाख |
| २. ठेवी | रु. ९१११ लाख |
| ३. कर्जे | रु. १४१८९ लाख |
| ४. एकूण खेळते भांडवल | रु. १९५५१ लाख |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.

२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.

४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पतपुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

**सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक**

डॉ. या. पु. भोसीकर, कार्यकारी संचालक

श्री. नि. श्री. सपकाळ, एम्. ए., एलएल. बी., अध्यक्ष

---

तारेचा पत्ता : "मॉर्गेज" मी

फोन मुख्य कार्यालय : २६७८० १/२/३ (३ लाईन्स)

व्य. कार्यकारी संचालक : २६१४९७ (डायरेक्ट लाईन)

उपकार्यालय नं. १ : २६०३०६ नं. २ : २६०००६

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड डेव्हलपमेंट बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.

( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २० प्राथमिक भूविकास बँका या बँकेच्या सभासद आहेत. बँकेने नवीन बांधकामासाठी विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स वगैरे सर्वांगसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९७१ अखेर बँकेचे भागभांडवल ८ कोटी ८७ लाख, गंगाजळी ६९ लाख, कर्जरोखे निधीची गुंतवणूक ४५ कोटी व येणे कर्ज ११५·५५ कोटी आहे.

भी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गांवळे, व्यवस्थापक

जी. पी. भावे, कार्यकारी संचालक

## आयातीत लक्षणीय घट; निर्यातीत विविधता व वाढ

गेल्या २५ वर्षात भारताच्या परदेश व्यापारात सुमारे तिपटीने वाढ झाली आहे. परंतु त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे त्याच्या रचनेत आणि दिशेत गुणवाचक बदल झाले आहेत. स्वातंत्र्य संपादनानंतरच्या २५ वर्षांच्या काळात "वसाहतवादी" व्यापार पद्धतीचा त्याग करून त्याऐवजी एका सार्वभौम व स्वतंत्र राष्ट्राला साजेल अशा व्यापारपद्धतीचा अंगीकार केला आहे.

भारताच्या निर्यात व्यापारात खूपच विविधता येऊन मूलभूत बदल झाले आहेत. ताग, चामडे, लाख, काजू, इत्यादींसारख्या काही ठराविक स्वरूपाचा शेतकी माल व कच्चा मालच केवळ पाश्चात्य बाजारपेठांना पुरवठा करण्यापुरताच भारताचा निर्यात व्यापार परंपरागत स्वरूपात चाललेला होता. परंतु एक गतिमान, जगातील सर्व देशांशी, विशेषत: पूर्व युरोपातील समाजवादी देश आणि आशिआ, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका यांतील विकसनशील देशांशी निर्यात व्यापार करून त्यांच्याशी संबंध प्रस्थापित करू इच्छिणारा देश म्हणून आज भारताकडे पाहिले जाते. पूर्वीची प्रतिमा जाऊन भारताची ही नवी प्रतिमा या क्षेत्रात प्रस्थापित झाली आहे.

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा भारताच्या एकूण निर्यातीत ६० टक्के निर्यात चहा, कापूस, ताग आणि सुती कापड या चार वस्तूंची असे. आज मात्र या वस्तूंच्या निर्यातीचे एकूण निर्यातीशी प्रमाण ३० टक्क्यांहूनही कमी आहे. भारताचा व्यापार काही प्राथमिक कच्चा माल व पदार्थ किंवा कृषी उद्योगातील उत्पादने यापुरता उरलेला नाही.

आज काही नवीन प्रकारच्या उत्पादनाचा भारताच्या एकूण निर्यातीतील वाटा ४० टक्क्यांहूनही अधिक आहे. १९४७–४८ मध्ये त्यांचे प्रमाण ५ टक्क्यांहूनही कमी होते. भारतात तयार झालेल्या अनेक ग्राहकोपयोगी वस्तू, यंत्रसामग्री, वाहतूक-सामग्री, अवजड विद्युत वहन तारा, रेल्वे रूळांची सामग्री इत्यादी सामग्रीची निर्यात केवळ विकसनशील देशांसच नव्हे तर औद्योगिक देशांच्या प्रगत बाजारपेठांतही होत आहे. प्रगत देशांशी स्पर्धेत टिकाव धरून जागतिक पातळीवरील टेंडरे मिळवून यांपैकी अनेक उत्पादनाची निर्यात केली जाते. यंत्रसामग्री आणि उपकरणे तसेच तांत्रिक ज्ञान व अंमलबजावणी कार्यक्रम-डिझायनिंग, बांधकाम इत्यादी सेवा यांचा समावेश असलेल्या प्रकल्पाबद्दलची निर्यात कंत्राटे भारतास मिळाली आहेत. तांत्रिक ज्ञान व भांडवली स्वरूपाची यंत्रसामग्री निर्यात करणारा देश म्हणून भारत झपाट्याने पुढे येत आहे. भारताचा परदेश व्यापार आता अनेक देशांशी चालू आहे.

स्वातंत्र्यापूर्वी भारतात मुख्यत: आयात होणाऱ्या तयार ग्राहकोपयोगी मालाची आयात आता बंद झाली आहे. भौगोलिक दृष्टयाही आपल्या आयातीत पुष्कळ प्रमाणात विविधता आली आहे. अन्नधान्याची अलीकडच्या काळापर्यंत मोठ्या प्रमाणात होणारी आयातही जवळजवळ थांबली आहे. या क्षेत्रातील स्वावलंबन मोहिमेचे यशच त्यावरून प्रतीत होते.

## स्टेट ट्रॅन्सपोर्ट संघटनांना होणारा नफा

देशातील राज्य वाहतूक मंडळांना त्यांनी गुंतविलेल्या भांडवलावर ३३ टक्के नफा होतो. त्यांना याहीपेक्षा अधिक नफा होऊ शकेल. पण त्यांना गाड्या बांधण्यासाठी लागणारे एंजिनासकट सांगाडे पुरेसे मिळत नाहीत. प्रवासी वाहतुकीपासून नफा मिळण्यास ताबडतोब सुरवात होते. राज्य वाहतूक मंडळात एकूण ३०० कोटी रुपयांचे भांडवल गुंतलेले आहे. ह्या संघटना देशाच्या तिजोरीत दरसाल ६० कोटी रुपये प्रत्यक्ष कराच्या रूपाने व ४० कोटी रुपये अप्रत्यक्ष कराच्या रूपाने भर घालीत असतात. सध्या देशात ४० हजार मोटारगाड्या वाहतुकीत गुंतलेल्या आहेत. दरसाल ४ हजार नव्या गाड्या जुन्यांच्या जागी घ्याव्या लागतात.

---

## युगांडामधून भारतीय वसाहतवाल्यांची हकालपट्टी

युगांडामधून ब्रिटिश नागरिकत्व असलेल्या सर्व आशिआई लोकांना हाकून देण्यात येत आहे. ९० दिवसांत त्यांनी युगांडातून बाहेर पडले पाहिजे. युगांडा देश ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग होता, त्या वेळी तेथे हे सर्व लोक उद्योगधंद्यासाठी गेलेले होते. परदेशात स्थाईक झालेले हिंदी लोक तेथील लोकांच्या आकांक्षांशी एकरूप होत नाहीत आणि तेथील नागरिकत्वही पत्करीत नाहीत, त्यामुळे तेथे ते नकोसे झाले आहेत. भारतीय पाळेमुळे असलेले ७३,००० हिंदी लोक युगांडात आहेत, त्यांपैकी ३०,००० लोकांनी तेथील नागरिकत्व घेतलेले नाही.


सांगली बँकेची

**दामदुप्पट योजना**

**१०% सरळ व्याज**

ही योजना आपण गुंतवलेल्या पैशाची दुपटीने परतफेड करते. आपल्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी किंवा त्यांना योग्य वयात रक्कम हाती पडण्यासाठी ही योजना सर्वोत्तम आहे. भांडवलाच्या दुप्पट पैसे देणाऱ्या या योजनेमुळे आपणास १०% सरळ व्याज मिळते. आपले पैसे विनासायास वाढविणाऱ्या या योजनेचा भरपूर फायदा घ्या.

आमच्याकडे दुसऱ्या ठेवी योजनाही आकर्षक दराने उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी आमच्या ६० शाखांपैकी कोठेही संपर्क साधा.

**दि सांगली बँक लिमिटेड**

रजि. ऑफिस–राजवाडा चौक, सांगली.

चेअरमन : बा. त्रिं. कोरके


शेतकऱ्याच्या समृध्दीतील
विश्वसनीय सहकारी
शेतीला मनाजोगा पाणीपुरवठा करण्यासाठी शेतात किर्लोस्कर पंपसेट बसविला की भरघोस पीक पदरात पडणारच किर्लोस्कर पंप विनासायास दीर्घकाल काम देतो. तो चालविण्यास कमी खर्च येतो आणि म्हणून त्याची किंमत लवकर वसूल होते किर्लोस्कर आसिआ स्टार्टर पंपसेटचे खात्रीपूर्वक रक्षण करतात. आणि म्हणूनच जाणते शेतकरी किर्लोस्कर पंपसेटची निवड करतात
वैशिष्ट्ये
• चालविण्यास सुलभ • विजेचा खर्च कमी
• मजबूत बांधणी म्हणून दुरुस्तीचा खर्च कमी
• सुटे भाग त्वरित उपलब्ध
• विक्रीपूर्व व विक्रीनंतरची सेवा
'केडी' मोनोब्लॉक
'केई' मोटर पंपसेट
'किर्लोस्कर-आसिआ' स्टार्टर
अधिक माहितीसाठी लिहा—
किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड
उद्योग भवन, टिळक रोड, पुणे २

# आपल्या उद्योग धंद्यात तुम्ही आता एकटे नाही...

कारण आता अडचणींवर मात करायला तुम्हाला मदत करण्यासाठीं **बँक ऑफ महाराष्ट्र** तुमच्या पाठीशी उभी आहे.
तुमच्या अडचणींची आम्हाला जाणीव आहे. तुमचा उत्कर्ष व्हावा म्हणून तुम्हाला कशी मदत करायची याची आम्हाला कल्पना आहे.
**छोटा उद्योगधंदा असणाऱ्यांची सेवा करण्याचे बँक ऑफ महाराष्ट्रचे ध्येयच आहे.**
आमची मदत घ्या... आणि तुम्हाला हे आढळून येईल की, बँक ऑफ महाराष्ट्रच्या रूपानें एक उपयोगी सतत मदत करणारा मित्रच तुम्हाला मिळालाय !

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस:
११७७ बुधवार पेठ, पुणे २.





हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)